# पुणे विद्यापीठ

परिपत्रक क्र. १९३/२०१३

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क वसूल न करणे बाबत

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती/भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग जातीच्या पात्र विद्यार्थ्यांना विहित अभ्यासक्रमासाठी सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभाग यांच्या मार्फत शिष्यवृत्ती मंजूर केली जाते. तसेच इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थांना प्रस्तावित शैक्षणिक शुल्क,परीक्षा शुल्क व इतर शुल्क ५०% दराने शासनाकडून प्रतिपूर्ती करण्यात येते. तथापि बऱ्याच शैक्षणिक संस्थांमार्फत सदरहू जातीच्या पात्र विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शुल्क वसूल करण्यात येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. जी महाविद्यालये अशा प्रकारे फी वसूल करतील त्यांच्यावर कठोर कार्यवाही करण्यात येईल असे शासनाने स्पष्ट आदेश दिलेले आहेत.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून फी वसूल करण्यात येऊ नये यासंदर्भात शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार विद्यापीठाने सर्व शैक्षणिक विभाग व सर्व संलग्नित महाविद्यालये व संस्था यांना स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. सोबत विद्यापीठ परिपत्रक क्र. २९२/२००८ दि. २०/०८/२००८, तसेच पत्र संदर्भ क्र शै. प्रवेश १३३९ दि. १६/०५/२०११ व शासनआदेशाच्या प्रती पुन:श्च माहितीसाठी जोडत आहे.

या परिपत्रकाद्वारे सर्व शैक्षणिक विभाग पुणे विद्यापीठ, सर्व संलग्नित अनुदानित आणि विनाअनुदानित महाविद्यालये/संस्था यांना पुन:श्च सूचित करण्यात येते की, विद्यापीठाने ठरविलेल्या दरांप्रमाणे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाकडून शिक्षण शुल्क, प्रयोगशाळा शुल्क, ग्रंथालय शुल्क, जिमखाना शुल्क, इतर शुल्क एक्स्ट्रा करिक्युलर ॲक्टीव्हीटीज, व परीक्षा शुल्क याची प्रतिपूर्ती होत असल्याने कोणत्याही परीस्थितीत मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून सदर शुल्क वसूल करण्यात येऊ नये/ आकारण्यात येऊ नये. शासन आदेशाचा भंग झाल्यास संबंधितास जबाबदार धरून नियमानुसार कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७ )
संदर्भ : शै. प्रवेश/3085 )
दिनांक : 23/07/2013 )

सही 23/7/2013
सहा.कुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत :

मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक पदव्युत्तर विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे
मा. प्राचार्य/मा. संचालक सर्व संलग्नित महाविद्यालये व संस्था.

# पुणे विद्यापीठ

शैक्षणिक प्रवेश विभाग

संदर्भ क्र. शै. प्रवेश/933e

दि.: १६/०५/२०११

प्रति,

१. मा. प्राचार्य / संचालक,
सर्व मान्यताप्राप्त महाविद्यालये व संस्था,

२. मा. विभागप्रमुख
सर्व शैक्षणिक विभाग,
पुणे विद्यापीठ,
पुणे – ४११ ००७

विषय :– शुल्काबाबत...

महोदय,

विद्यापीठ आदेश संदर्भ क्र. पीजीएस/५४२ दि. १७/०२/२०११ अन्वये, शैक्षणिक वर्ष २०११–१२ पासून पदवीपूर्व व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेणा–या विद्यार्थ्यांसाठी सुधारीत शुल्क ठरविण्यात आले आहे.

सुधारीत शुल्काबाबतचा आदेश पीजीएस/५४२ दि. १७/०२/२०११ विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून सदर आदेशातील शुल्क शैक्षणिक वर्ष २०११–१२ मध्ये प्रथम वर्षास, शैक्षणिक वर्ष २०१२–१३ मध्ये प्रथम व व्दितीय व शैक्षणिक वर्ष २०१३–१४ मध्ये प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षासाठी या अनुक्रमाने आकारण्यात यावे. कृपया याची नोंद घ्यावी, ही विनंती.

**(वरील आदेशानुसार शुल्क आकारताना, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाकडून ज्या ज्या शुल्कांचा परतावा देण्यात येतो ते शुल्क कोणत्याही परिस्थितीत मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून घेऊ नये/आकारु नये. या संदर्भात शासन आदेशाचा भंग झाल्यास संबंधितास जबाबदार धरण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी)**

कळावे,

आपला विश्वासू

उपकुलसचिव 16/5/11
(शैक्षणिक प्रवेश विभाग)

# पुणे विद्यापीठ

## शैक्षणिक प्रवेश विभाग

परिपत्रक क्रमांक : २८२/ २००८

विषय : मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क वसुल न करणेबाबत.

संचालक, समाजकल्याण संचालनालय, पुणे यांनी परिपत्रक क्रमांक स.क.स./शिक्षण/ शै.स./भा.स.शि./शिफी/पफी/०४-०५/का-१००५/दिनांक २४ जून, २००४ अन्वये मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शुल्क वसुल करु नये याबाबत स्पष्ट सूचना दिल्या आहेत. (सोबत परिपत्रक)

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र.इबीसी-२००५/प्र.क्रं.१२८/मावक-२, दिनांक २७ जून, २००५ आणि विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, पुणे जिल्हा, पुणे यांनी त्यांचे पत्र क्र.विजिसकअ/पु/भाससि/शै.शुल्क/२००८-०९/१११२, दिनांक ३.७.२००८ अन्वये शासन सामाजिक न्याय विभाग निर्णय क्रमांक ईबीसी-२००३/प्रक्र ३०१/मारक-२, दिनांक १ नोव्हेंबर, २००३ नुसार शिष्यवृत्ती, शिक्षण फी, योजनेस पात्र असणा-या व सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षापासून प्रवेश घेणा-या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क वसूल करु नये. सन २००६-०७ पूर्वी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्काची परिपूर्ती तत्कालीन दराने करण्यात येत असल्याने त्यांच्याकडूनही त्या रकमेची वसुली करु नये. तसे निदर्शनास आल्यास संबंधित महाविद्यालय/संस्था यांच्याविरुध्द कारवाई करणे भाग पडेल. या आशयाच्या स्पष्ट सूचना समाजकल्याण अधिकारी यांनी भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी दिनांक १५ व १६.२.२००८ रोजी आबासाहेब गरवारे महाविद्यालयात सर्व प्राचार्यांची बैठक घेऊन दिलेल्या आहेत.

शासन निर्णय क्र.आदिशि-१२०४/प्र.क्र. ९/का १२, दिनांक ९ ऑगस्ट, २००४ परिशिष्ठ २ (१)(ब) व शासन निर्णय क्र.सामाजिक सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्र.इबीसी-२००३/प्र.क्र.३०१/मावक-२, दिनांक १ नोव्हेंबर, २००३ परिशिष्ट २ (१)(ब) अन्वये महाविद्यालयांनी/संस्थांनी मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून फी वसुल केल्यास त्यांच्यावर फौजदारी कार्यवाही करण्यात येईल असेही सर्वांना कळविलेले आहे. (सोबत शासन निर्णय)

विशेष समाजकल्याण अधिकारी, पुणे जिल्हा, पुणे यांचे पत्र क्र.जिसकअपुणे/भासशि/पफी/शिफी/०४-०५, दिनांक ३०.७.२००४ अन्वये सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक यांना मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून फी वसुल करु नये. तसे केल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल असे कळविलेले आहे.

सबब वरील नमूद केलेला शासन निर्णय व समाजकल्याण विभागाच्या सूचनांची वैशिष्टये खालीलप्रमाणे.

१. प्रवेश घेण्यासाठी पुरविण्यात येणा-या माहितीपुस्तकासोबतच यापुढे भारत सरकार शिष्यवृत्ती योजना व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क आवेदनपत्र जोडण्यात यावे.
२. विद्यार्थ्यांचे अर्ज भरुन घेण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित शिक्षण संस्थेची राहील.
३. प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांना पी.एल.ए.खाते उघडणे आवश्यक आहे.
४. शिष्यवृत्ती वाटप करण्याची, हिशोब ठेवण्याची व इतर प्रशासकीय जबाबदारी प्राचार्य/संचालक यांचेवर असेल. यात विलंब व गैरप्रकार झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्राचार्य/संचालक यांचेवर असेल.
५. विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क देण्याची जबाबदारी प्राचार्य/संचालक यांचेवर असेल. यात विलंब व गैरप्रकार झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्राचार्य/संचालक यांची असेल. यात दंडनीय कार्यवाहीची देखील तरतूद आहे.
६. शिष्यवृत्ती मंजूर करण्याचे अधिकार शासकीय व अनुदानित संलग्न महाविद्यालयाच्या प्राचार्य/संचालकांना प्रदान करण्यात आले आहेत. ९० टक्के तदर्थ अनुदान ३१ जुलै पूर्वी समाज कल्याण विभागाकडून प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी प्राचार्य/संचालकांची व प्रत्येक जिल्हा समाज कल्याण अधिका-यांची आहे.

७. मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची फी वसुल करु नये, तसे आढळल्यास संबंधित महाविद्यालयाविरुध्द फौजदारी स्वरुपाची कार्यवाही समाजकल्याण विभाग आणि प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडून होईल.

८. अनुसूचित जमातीकरिता शिष्यवृत्ती व फ्रिशिप योजना आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येत असून व भारत सरकार आदिवासी मंत्रालय, पत्र क्र. २००१४/१०/२००-टीडीए(व्हॉल्युम-३) दिनांक १९ फेब्रुवारी, २००४ मध्ये सविस्तर योजना दिलेली आहे. या विषयावर मा.प्रकल्प अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली वाडीया महाविद्यालयात दिनांक २७.५.२००८ रोजी झालेल्या प्राचार्य/संचालक बैठकीत प्रकल्प अधिकारी (आदिवासी विभाग), घोडेगांव, जिल्हा पुणे यांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारु नये असे स्पष्ट केले आहे.

या परिपत्रकानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, पुणे विद्यापीठाच्या अभ्यासक्रमासाठीचे जे जे शुल्क शासनाच्या समाजकल्याण आणि आदिवासी विकास प्रकल्प विभागाकडून मंजूर होणार आहे, ते ते शुल्क मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून आकारु नये.

शिष्यवृत्ती व फ्रिशिपकरिता पात्र असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून यापूर्वी शुल्क घेतले असल्यास ते त्वरित परत करण्यात यावे व त्यांच्याकडून शिष्यवृत्ती/फ्रिशिपचे अर्ज भरुन संबंधित विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी/प्रकल्प अधिकारी (आदिवासी कल्याण विभाग) यांना विद्यापीठाने निश्चित केलेल्या शुल्काचा तपशील देवून सादर करावे. प्रवेशाच्या वेळी योग्य प्राधिका-याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र घेण्यात यावे व त्वरित शिष्यवृत्ती/फ्रिशिपचे अर्ज भरुन संबंधित समाजकल्याण अधिकारी/प्रकल्प अधिकारी, आदिवासी विभा यांच्याकडे पाठवावेत. तसेच जे विद्यार्थी शिष्यवृत्ती/फ्रिशिपचे अर्ज भरणार नाहीत त्यांच्याकडून नियमानुसार पूर्ण फी घेण्यात यावी.

भ.ज.(क), भ.ज.(ड) व इ.मा.व.करिता क्रिमिलेअरचे तत्व लागू असल्याने या योजनेचा लाभ घेताना नॉन क्रिमिलेअरचे पत्र विद्यार्थ्याने महाविद्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

सदर शासन निर्णयाची योग्य प्रकारे अमलबजावणी करण्यात यावी व या प्रकरणी कोणत्याही प्रकारची अडचण असल्यास संबधित जिल्हा समाज कल्याण

अधिकारी/प्रकल्प अधिकारी अथवा उपकुलसचिव, विशेष कक्ष, पुणे विद्यापीठ यांचेशी संपर्क साधावा.

या कार्यालयाकडे मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शुल्क वसुल केल्याबाबत तक्रारी आल्यास आपल्या व महाविद्यालयाविरुध्द शासनाने व विशेष समाजकल्याण अधिकारी व प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगांव, ता.आंबेगाव, जिल्हा पुणे यांनी दिलेल्या सूचनेनुसार कारवाई करणेबाबत विशेष समाजकल्याण अधिकारी व प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे कळविण्यात येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दूरध्वनी क्रमांक :

१. विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, पुणे - ०२०-२४४५६३३६
२. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगांव, ता.आंबेगाव, जिल्हा पुणे. - ९५२१३३-२४४२६६

गणेशखिंड, पुणे ४११ ००७ )
संदर्भ क्र. : शै.प्रवेश/८०६६ )
दिनांक : २०/०८/२००८ )

संचालक,
म.व वि.वि.मं.

# विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय,

३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य पुणे १.

दुरध्वनी क्र. ०२०/२६१२७९०२ ई मेल directorvjntobcsbc@yahoo.co.in

परिपत्रक
महत्वाचे

विजाभजसं/शिक्षण/शिष्यवृत्ती/शिक्षण फी-परिक्षा फी /८७
२०१३-१४
दि. २८.६.२०१३

प्रति,
प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण (सर्व)
सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (सर्व)

विषय :- विजाभज इमाव व विमाप्र मॅट्रिकोत्तर विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती व शिक्षण फी परिक्षा फी प्रतिपूर्ती देण्याच्या योजनेच्या कार्यपध्दतीबाबत

संदर्भ :-१)महाराष्ट्र शासन निर्णय सामाजिक, सां.का.क्रिडा व विशेष सहाय्यक विभाग क्र.इबीसी-२००३/प्र.क्र३०१/मावक-२, दि. १.११.२०१३
२) शासन निर्णय सामाजिक न्याय सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्र.इमाव-२००४/प्र.क्र१३८/मावक-३दि. १ जुलै २००५
३)आरक्षण हक्क संरक्षण समिती, धानोरी रोड, विश्रांतवाडी, पुणे.१५ यांचे दि. २७.६.२०१३ चे निवेदन.

भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क योजने अंतर्गत शासन मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेणा-या विजाभज, इमाव व विमाप्र जातीच्या पात्र विद्यार्थ्यांना विहीत अभ्यासक्रमांसाठी उत्पन्नाच्या निकषांवर सामाजिक न्याय विभागामार्फत शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परिक्षा फी मंजूर केले जाते. तथापि ब-याच शैक्षणिक संस्थांमार्फत सदरहू जातीच्या पात्र विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क वसूल करण्यात येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. या संदर्भाने शासनाने वेळोवेळी पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून प्रवेशाचे वेळी फी वसूल न करण्याबाबत स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. त्याचबरोबर संचालनालयाने सुध्दा पात्र विजाभज, इमाव व विमाप्र मॅट्रिकोत्तर विद्यार्थ्यांकडून नियमानुसार देय असलेली फी वसूल करु नये व तसे आढळल्यास संबंधित महाविद्यालया विरुध्द कायदेशिर कारवाई करण्याचे निर्देश सुध्दा दिलेले आहेत. असे असताना सुध्दा काही महाविद्यालयांकडून त्याचे उल्लंघन करण्यात येवून वर नमुद प्रवर्गाच्या पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून सक्तीने फी वसूली केली जाते अथवा, त्यांचे निकाल राखुन ठेवणे तसेच त्यांना महाविद्यालयात पुढील वर्षी प्रवेश न देणे अशा प्रकारच्या गंभीर तक्रारी मोर्चे व धरणे

आंदोलनाच्या माध्यमातून संचालनालयाकडे होत असल्याने आपल्या स्तरावरुन महाविद्यालयांचे प्राचार्य तसेच संस्थाचालकांची बैठक आयोजित करुन सदरचे प्रश्न गांभिर्यपुर्वक हाताळण्यात यावेत. पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून नियमानुसार देय असलेली शैक्षणिक शुल्क व परिक्षा शुल्क प्रतिपुर्ती शासनाकडून उपलब्ध निधी नुसार करण्यात येत असल्याने अशा फीची वसुली संबंधित पात्र विद्यार्थ्यांकडून करण्यात येवू नये याबाबतच्या स्पष्ट सूचना संबंधित शैक्षणिक संस्थांना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात. तसेच स्थानिक पातळीवर विविध प्रसार माध्यमांव्दारे संबंधित शैक्षणिक संस्थांना योग्य त्या स्वरुपाच्या सुचना पोहचतील अशा प्रकारे विनामुल्य जाहीर प्रसिध्दी देण्यात यावी.

या परिपत्रकाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी. तसेच विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील पात्र विद्यार्थी शैक्षणिक लाभापासून वंचित राहणार नाहीत याबाबत योग्य ती ठोस उपाययोजना करावी व केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल संचालनालयास व शासनास सादर करावा.

संचालक
विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर

१) मा.सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई -३२ यांना विनंती करण्यात येते की, आपल्या स्तरावरुन संचालक उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे मार्फत सर्व प्राचार्य व संस्थाचालक यांना वरील प्रमाणे कार्यवाही करणेबाबत आदेशित व्हावे.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

१) मा.कुलगुरु, सर्व विद्यापीठ पुणे विद्यापीठ, पुणे ४११००७, महाराष्ट्र.
२) संचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई
३) संचालक, वैद्यकीय शिक्षण व औषध द्रव्ये विभाग, मुंबई
४) आरक्षण हक्क संरक्षण समिती, जगराम कॉम्लेक्स, ए-१०, धानोरी रोड, विश्रांतवाडी पुणे - १५

अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये
कला, विज्ञान आणि वाणिज्य या शाखांमध्ये प्रवेश
घेतलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या
जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण
शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शुल्क मंजूर करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक इबीसी-२००५/प्र.क्र.१२८/मावक-२,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ जून २००५.

वाचा : १)शासन निर्णय, सा.न्या.सां.का.व वि.स. विभाग क्रमांक इबीसी-२००३/प्र.क्र.३०१/
मावक-२, दिनांक १ नोव्हेंबर, २००३
२)शासन निर्णय, सा.न्या.सां.का.व वि.स. विभाग क्रमांक : इबीसी-२००४/ प्र.क्र.३०/मावक-२,
दिनांक ५ जानेवारी २००५.

परिपत्रक - अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये कला,विज्ञान व वाणिज्य या शाखांमध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उत्पन्न मर्यादेच्या अधीन राहून भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती देण्यात येते. तसेच सर्व विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क माफीची योजना लागू करण्यात आली आहे. तथापि शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याकडून वेगवेगळ्या दराने व वेगवेगळ्या शुल्कासाठी महाविद्यालयास प्रतिपूर्ती करण्यात येते. याबाबत सर्व राज्यात एकसूत्रीपणा येण्यासाठी असे निदेश देण्यात येत आहेत की, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयातील कला,विज्ञान व वाणिज्य या शाखांमध्ये शिकत असलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती,भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना तसेच अनुदानित महाविद्यालयातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्या महाविद्यालयाच्या संबंधीत विद्यापीठाने ठरविलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्क, प्रयोगशाळा शुल्क, ग्रंथालय शुल्क, जिमखाना शुल्क, इतर शुल्क, एक्स्ट्रा करिक्युलर ॲक्टीव्हिटीज, मॅगेझीन फी, नोंदणी शुल्क, कॉम्प्युटर प्रॅक्टीकल शुल्क व परीक्षा शुल्क यांची महाविद्यालयाला प्रतिपूर्ती करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(न.मा.शिलवंत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

पुणे विद्यापीठ

संदर्भ क्र. शै. प्रवेश/२००५/२३६६ दि. २०.०७.२००५

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :
१) मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये
२) मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था

अनुसूचित जातीसाठी भारत सरकार
मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना व शिक्षण शुल्क परीक्षा
शुल्क देण्याची योजना - कार्यपध्दतीबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक-इबीसी-२००३/प्र.क्र.३०१/मावक-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
दिनांक : १ नोव्हेंबर, २००३

प्रस्तावना : भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना ही १९५९-६० पासून राज्य शासनाकडे केंद्र शासनाकडून हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. या योजनेखाली अनुसूचित जातीच्या (बौद्धांसह) विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमानुसार रु. ९०/- ते ४२५ /- या दराने निर्वाह भत्ता अदा केला जातो. यावरोबरच शिक्षण फी , परीक्षा फी व कनिष्ठ महाविद्यालय / महाविदयालयाची देय असलेली इत्तर फी प्रतिपूर्ती केली . जाते. या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून बांधील खर्चाच्या वर येणा-या खर्चाच्या १०० टक्के अनुदान मंजूर करण्यात येते. महागाई निर्देशांकानुसार केंद्र शासनाकडून दर दोन वर्षांनी या योजनेकरीता उत्पन्नाची मर्यादा वाढविण्यात येते. सध्या सदर योजनेखाली विद्यार्थ्यांच्या पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु.४९,०००/- व रु. ६५,२९०/- एवढी निश्चित करण्यात आलेली आहे.

२. मान्यताप्राप्त सर्व स्तरावरील शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेणा-या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे वय व उत्पन्न विचारात न घेता शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क शिक्षण विभागाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे संस्थेला प्रदान करण्यात येते. तथापि, ब-याच शैक्षणिक संस्थांकडून अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क वसूल करण्यात येते , असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे याबाबत कार्यपध्दती ठरविण्याची आवश्यकता आहे.

३. भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती या योजनेखाली विविध शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालयाकडून शिष्यवृत्तीसाठीचे प्रस्ताव जिल्हा स्तरावर विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे प्राप्त होतात. दरम्यानच्या काळात विद्यार्थी संख्या व महाविद्यालयांची संख्या मोठया प्रमाणात वाढलेली आहे. त्यामुळे भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रस्तावांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झालेली असल्याने त्याची छाननी करणे, देयक तयार करणे, कोषागारातून रक्कम पारीत करणे व धनाकर्षाव्दारे महाविद्यालयाकडे वर्ग करुन त्यांच्यामार्फत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे व शिक्षण शुल्क, परीक्षा

शुल्क रक्कमेचे वाटप करण्यास अनेकवेळा विलंब होतो. पर्यायाने विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता वेळेवर न मिळाल्याने त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो. काही वेळा विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळाली नाही म्हणून निवेदने, आंदोलने अशा मार्गांचा अवलंब करतात. यासाठी शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क वाटप योजनेत सुलभता आणून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क वेळेवर देण्यासाठी महाविद्यालय स्तरावरच शिष्यवृत्ती मंजुरीचे अधिकार प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> : अनुसूचित जातीसाठी भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क योजना राबविण्यामध्ये सुलभता आणण्यासाठी शासन आता भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेमध्ये विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्याचे अधिकार विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याऐवजी शासकीय व अनुदानित मान्यताप्राप्त विद्यापीठ संलग्न उच्च माध्यमिक वर्ग / कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालयांचे प्राचार्य यांना प्रदान करण्यास शासन मंजूरी देत आहे. त्यांनी शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्ती व सोबतच्या परिशिष्ट - १, २, ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार शिष्यवृत्ती रक्कम मंजूर करावयाची आहे. शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क मंजूर करण्याचे अधिकार पूर्वीप्रमाणेच विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना राहतील. तसेच मान्यताप्राप्त विना अनुदानित महाविदयालयातील व परराज्यात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम पूर्वीप्रमाणेच विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे मंजूर करतील.

२. <u>अटी व शर्ती</u> :-

१ अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शासकीय व मान्यताप्राप्त विद्यापीठ संलग्न अनुदानित उच्च माध्यमिक वर्ग / कनिष्ठ महाविद्यालय /महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी पुरविण्यात येणा-या माहिती पुस्तकासोबतच यापुढे भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काचे आवेदन पत्र जोडण्यात यावे.

२ सदर योजनेखाली नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरुन घेण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित शिक्षण संस्थेची राहील.

३ विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी संबंधित कनिष्ठ महाविद्यालय/ महाविद्यालय यांच्याकडून तरतूदीची मागणी प्राप्त करुन घ्यावी व मागील वर्षातील खर्चाच्या ९० टक्के रक्कम तदर्थ अनुदाना-पोटी कोषागारातून पारीत करुन माहे जुलै अखेर पर्यंत महाविद्यालयांना वाटप करावी.

४ कनिष्ठ महाविद्यालय व महाविद्यालयास देण्यात आलेली तदर्थ अनुदानाची रक्कम वैयक्तिक स्वीय लेखा (पी.एल.ए.) खात्यातच जमा राहील. पी.एल.ए. खात्याव्यतिरिक्त इतर ठिकाणी सदरची रक्कम जमा करण्याची अनुमती महाविद्यालयास रहाणार नाही. कनिष्ठ महाविद्यालय व महाविद्यालयाचे प्राचार्य सदर रकमेतून आवश्यक त्या प्रमाणात रक्कम काढून विद्यार्थ्यांना दरमहा बँकेमार्फत धनादेशाद्वारे वाटप करतील.

५ कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालयास देण्यात आलेल्या तदर्थ अनुदानाचे समायोजन पुढील आर्थिक वर्षात मुल्यनिर्धारण करुन विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी पूर्ण करतील.

६ कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालयास प्राप्त झालेले परिपूर्ण अर्ज छाननी करुन त्यास मंजुरी देण्याची कार्यवाही संबंधित कनिष्ठ महाविद्यालय व महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी प्रचलित नियमानुसार करावी व त्याची प्रत विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे सादर करावी.

७ महाविद्यालयातील नवीन व नुतनीकरण शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क अर्जाची नोंद संबंधित महाविद्यालयाने विहित नोंदवहयामध्ये अद्ययावत ठेवावी.

८ संबंधित महाविद्यालयाने शिष्यवृत्ती मंजुर केलेल्या आदेशानुसार विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील कंट्रोल रजिस्टरमध्ये नोंद घ्यावी.

९ कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालयांना अग्रीमापोटी दिलेल्या रक्कमेची अद्ययावत नोंद विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी स्वतंत्र नोंदवहीमध्ये महाविद्यालयनिहाय ठेवतील.

१० विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे संबंधित महाविद्यालयास, दिलेल्या अग्रीम रक्कमेचे समायोजन / निर्धारण झाल्यानंतर उर्वरित रक्कम संबंधित महाविद्यालयास अदा करतील / वसूली करतील.

११ भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्काची उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित महाविद्यालयाने दरवर्षी तदर्थ रक्कम प्राप्त होण्यापूर्वी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे सादर करणे बंधनकारक आहे.

१२ भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्कापोटी समाजकल्याण विभागामार्फत प्राप्त झालेल्या रक्कमेचा स्वतंत्र हिशोब ठेवण्यात यावा. सदर रक्कमेचे लेखा परिक्षण सक्षम प्राधिका-यामार्फत करण्यात येईल.

१३ संबंधित कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या अर्जांच्या अनुषंगाने त्या त्या वर्षी लागणा-या शिष्यवृत्तीच्या तरतुदीची अंतिम एकूण मागणी १५ नोव्हेंबर पूर्वी विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे करतील.

१४ भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काच्या संदर्भात संबंधित

कनिष्ठ महाविद्यालय/महाविद्यालयाची तपासणी व चौकशी करण्याचे अधिकार विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी किंवा सामाजिक न्याय विभागाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिका-यास राहतील.

१५ भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना संबंधित कनिष्ठ महाविद्यालय / महाविदयालयाचे प्राचार्यामार्फत त्यांच्या स्तरावर मंजुरीची कार्यवाही करुन वेळेत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काचे वाटप सुलभतेने व शीघ्रतेने करण्यासाठी प्रति विद्यार्थी रु. ५/- याप्रमाणे सेवाशुल्क मिळण्यास महाविद्यालय पात्र राहील. सदर सेवा शुल्काची रक्कम भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्कापोटी प्राप्त होणा-या तरतुदीमधून संबंधित महाविद्यालयास जिल्हयाचे विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी मंजूर करुन अदा करतील .

१६ या योजनेखाली शासकीय व मान्यताप्राप्त विद्यापीठ संलग्न अनुदानित उच्च माध्यमिक वर्ग / कनिष्ठ महाविद्यालये / महाविद्यालयाच्या प्राचार्यांना शिष्यवृत्ती मंजुरीचे अधिकार प्रदान करण्यात आले असले तरी त्यावर सामाजिक न्याय विभागाचे नियंत्रण राहील. या योजनेखाली विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्राचार्यांची राहील. यात विलंब, गैरप्रकार अथवा काही अपहार झाल्यास संबंधित शैक्षणिक संस्थेविरुध्द दंडनिय कार्यवाही आणि / किंवा व्यवस्थापन त्याबाबतची जबाबदारी संबंधितांवर १५ दिवसांत निश्चित करुन संबंधितांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करेल. आवश्यकतेनुसार अफरातफरीच्या प्रकरणात प्राचार्य तात्काळ गुन्हा नोंदवतील आणि ज्या प्रकरणी सकृत दर्शनी प्राचार्य जबाबदार असल्यास विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी गुन्हा दाखल करतील. योग्य त्या चौकशीनंतर अफरातफर केलेल्या रकमेची वसूली दंडनिय व्याजासह संबंधित महाविद्यालयास देय असलेल्या अनुदानातुन वसूल केली जाईल.

३. सदरहू कार्यपद्धती सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षापासून लागू राहील.

४. सदरहू शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौ. संदर्भ क्रमांक ५३५/ ०३/ व्यय-१४, दिनांक २६/६/२००३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( नं. मा. शिलवंत )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रती,
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव

एच-895(1000-11-03)-2अ

मा.मंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव
सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई.
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,मंत्रालय,मुंबई.
सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग (व्यय १४) मंत्रालय, मुंबई
संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, म.रा., मुंबई
उपसंचालक, तंत्र शिक्षण- सर्व विभागीय कार्यालये.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,म.रा.,मुंबई.
उपसंचालक, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग - सर्व विभागीय कार्यालये.
सर्व अधिष्ठाता, वैद्यकीय महाविद्यालये.सर्व प्राचार्य, अभियांत्रिकी महाविद्यालये/
सर्व प्राचार्य, तंत्रनिकेतने / सर्व कृषि विद्यापीठे./सर्व विद्यापीठे.
जिल्हाधिकारी (सर्व)/मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद (सर्व).
विभागीय समाज कल्याण अधिकारी (सर्व)/विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी (सर्व).
समाज कल्याण अधिकारी गट-अ,जिल्हा परिषद (सर्व).
निवडनस्ती-का-मावक २

क्र सकसं / शिक्षण / भामशि / ०३-०४/ ५/ ५/३
समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४११ ००१
दिनांक - १ जानेवारी २००४

प्रत - माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीस्तव रवाना

१. विभागीय समाज कल्याण अधिकारी ( सर्व )
२. विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी ( सर्व )

त्यांना कळविण्यात येते की त्यांनी सदर शासन निर्णयाच्या प्रती त्यांच्या कार्यक्षेत्रातील संबंधित सर्व शैक्षणिक संस्थांना पाठवाव्यात व भारत सरकार शिष्यवृत्तीच्या नवीन कार्यपध्दतीबाबत मुख्याध्यापक / प्राचार्य यांना अवगत करावे. सदर कार्यपध्दती सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षापासून अमलात आणावयाची असल्याने आपल्या स्तरावरुन यासंबंधी आवश्यक सूचना द्याव्यात.

३. सह संचालक, उच्च शिक्षण ( सर्व )
४. सह संचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये ( सर्व )
५. शिक्षण उप संचालक ( सर्व ) यांना माहितीस्तव
६. उप संचालक, वैद्यकीय शिक्षण व औषध द्रव्य विभाग, विभागीय कार्यालये ( सर्व )
७. उप संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालये ( सर्व )
८. शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ), जिल्हा परिषद ( सर्व ) यांना माहितीस्तव
९. समाज कल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद ( सर्व ) यांना माहितीस्तव

संचालक, समाज कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता

# परिशिष्ट - १

## भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती , शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क वितरणाचे वार्षिक वेळापत्रक

| अ.क्र. | महिना | करावयाची कार्यवाही |
| --- | --- | --- |
| १ | एप्रिल | १ महाविद्यालयाने मागील आर्थिक वर्षात घेतलेले अग्रीम व अंतिम अनुदान असे एकत्रित घेतलेल्या अनुदानाचा अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची संख्या व वितरित शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क यांची माहिती सादर करणे<br>२ महाविद्यालयाने उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करणे |
| २ | मे | १ महाविद्यालयाने विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडून शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क फॉर्म व इतर स्टेशनरी उपलब्ध करुन घेणे.<br>२ महाविद्यालयाने चालू वर्षासाठी आवश्यक अग्रीमाची संवर्गनिहाय प्रवेशित विद्यार्थी संख्येची आकडेवारी कळविणे व लागणा-या अनुदानाची मागणी करणे. |
| ३ | जून | १ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज देतेवेळी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क, व्यावसायिक पाठ्यक्रमांशी संलग्न असणा-या वसतिगृहात राहणा-या विद्यार्थ्यांचा निर्वाह भत्ता या योजनेचे अर्ज देणे तसेच अकरावी विज्ञान शाखेमध्ये प्रवेशित अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना जाती वैधता अर्जांचे वितरण करणे.<br>२ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज त्यांच्याकडून स्वीकारते वेळी प्रवेश अर्जासोबतच वरील सर्व अर्ज भरुन घेणे व या अर्जासोबत आवश्यक असलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र , मागील वर्षाचे उत्तीर्ण प्रमाणपत्र, फोटो इत्यादी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करुन घेणे.<br>३ महाविद्यालयांनी ज्या विद्यार्थ्यांचे जिल्हा बदल वा महाविद्यालय बदल असल्यास, जिल्हा बदल प्रमाणपत्र तसेच महाविद्यालय बदल प्रमाणपत्र घेऊन त्या वर्षाचे संबंधित विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क मंजुरीचे आदेश प्राप्त करुन घेणे. |
| ४ | जुलै | १ महाविद्यालयातील सर्व प्रवेशित अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या अर्जांची छाननी करुन अग्रीम मंजूर आदेश काढणे व त्याची यादी कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावणे.<br>२ विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालयाकडून अग्रीम रक्कमेचे धनादेश प्राप्त करुन घेणे.<br>३ सर्व अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे शक्यतो एकाच बँकेत खाते उघडणे. |

एम-४९५(1000-11-03)-4

परिशिष्ट - २

## शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काचे जिल्हा कार्यालयाकडून प्रदान

शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क प्रदाने या योजनेअंतर्गत शैक्षणिक संस्थेला गतवर्षी मंजूर झालेल्या शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काच्या रक्कमेपैकी ६० टक्के रक्कम जूनमध्ये तदर्थ अनुदान म्हणून मंजूर करण्यात येते. त्यातून दरमहा ठराविक रक्कम निर्वाह भत्ता म्हणून शैक्षणिक संस्थेतर्फे अदा करण्यात येते व शैक्षणिक वर्षाच्या शेवटी एकूण रक्कम मंजूर करुन त्यातून तदर्थ अनुदानाचे समायोजन केले जाते. म्हणजेच मंजुरीची प्रक्रिया ही वर्षाच्या शेवटी केली जाते. याकरिता सर्व संस्थांकडून सविस्तर प्रस्ताव विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्या कार्यालयाकडून मागविण्यात येतात व त्याची छाननी केली जाते व त्यानंतर मंजूर रक्कमेचे धनादेश संबंधित महाविदयालयाकडे पाठविले जातात. त्याऐवजी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती मंजुरीचे अधिकार संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क मंजूर करण्याचे अधिकार पूर्वीप्रमाणेच विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना राहतील. त्याकरिता खालीलप्रमाणे कार्यपध्दती अंमलात आणण्यात यावी.

१. तदर्थ अनुदान मंजुरी -

अ गतवर्षी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मंजुर करण्यात आलेल्या शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क यासाठी अदा करण्यात आलेल्या रक्कमेच्या ९० टक्के रक्कम महाविद्यालयाच्या मागणीप्रमाणे विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी तदर्थ अनुदान मंजूर करुन माहे जूनमध्ये महाविद्यालयास पाठवावे. सदरहू रक्कम महाविद्यालयाने त्वरीत वैयक्तिक स्वीय लेखा (पीएलए) खात्यामध्ये जमा करावी व त्यातून विद्यार्थ्यांना दरमहा धनादेशाद्वारे शिष्यवृत्तीचे वाटप करावे तसेच शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम महाविद्यालयाच्या वैयक्तिक खात्यावर वर्ग करुन घ्यावी. पी.एल.ए. खात्यातून आवश्यक तेवढीच रक्कम वेळोवेळी काढण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत सर्व रक्कम अथवा आवश्यकते पेक्षा जास्त रक्कम काढून अन्य बँकेत /खात्यावर जमा करु नये. असा प्रकार आढळल्यास आर्थिक अनियमितता झाली असे समजून प्राचार्यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.

ब शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रदान करणे या योजनेखाली वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या ९०% तदर्थ अनुदानातून विद्यार्थ्यांच्या फीची प्रतिपूर्ती करावी. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची फी वसुल करु नये. तसे आढळल्यास संबंधित महाविद्यालयाविरुध्द फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्यात येईल.

क. ज्या महाविद्यालयांनी पी.एल.ए. खाते अदयाप उघडले नसेल त्यांनी संबंधित कोषागार अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन खाते उघडण्याची कार्यवाही करावी यासाठी महालेखापाल मुंबई / नागपूर यांच्याकडे अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

ड ९०% तदर्थ अनुदान प्राप्त होताच सदर महाविद्यालयाने त्याची मुद्रांकित पावती (स्टॅम्प रिसीट) विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालयास पाठविणे बंधनकारक राहील.

२. अंतिम अनुदान मंजुरी

अ अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क , परीक्षा शुल्क मंजूरीकरीता अर्ज प्राप्त झाल्यावर त्याची छाननी करुन शिष्यवृत्तीचे अर्जाची मंजूरी इत्यादी सर्व कार्यवाही महाविद्यालयाने करावयाची आहे. प्रत्येक विद्यार्थ्यास शैक्षणिक वर्षात मंजूर करावयाची रक्कम मंजूर झाल्यावर त्यातून त्यास अदा करण्यात आलेल्या तदर्थ अनुदानाच्या रक्कमेचे समायोजन करावे व उर्वरित १०% अनुदानाची मागणी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे माहे १५ नोव्हेंबर अखेर मंजूरी आदेश व विद्यार्थ्यांच्या संपूर्ण तपशीलासह पाठविण्यात यावी.

ब महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या उर्वरित १०% अनुदानाच्या माहितीनुसार विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी सदरहू रक्कम मंजूर करुन महाविद्यालयास माहे फेब्रुवारी अखेर पाठवतील.

क वरील प्रमाणे अंतिम अनुदान प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यास पूर्ण शिष्यवृत्तीचे वाटप करुन भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क , परीक्षा शुल्क रक्कमेचे उपयोगिता प्रमाणपत्र परिपूर्णपणे विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालयास संबंधित महाविद्यालयाने माहे एप्रिल अखेर सादर करावे.

३. मुल्यनिर्धारण

विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालयामार्फत मंजूर करण्यात आलेल्या वरील रक्कमेचे तपासणीचे काम माहे डिसेंबर व जानेवारी या कालावधीमध्ये करण्यात येईल. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबी तपासण्यात येतील.

अ भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण फी, परीक्षा फी ची आवेदन पत्रे व सहपत्रे

ब वैयक्तिक स्थीय लेखा ( पी.एल.ए.) व विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती मिळणेबाबतच्या मुद्रांकित पावत्या, खतावणी इत्यादी

क भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क वाटप नोंदवही

ड मुल्यनिर्धारण तक्ते

ई विद्यार्थ्यांना बँकेमार्फत वितरण होते का ? याची पाहणी.

४. लेख्यांचे वर्गीकरण

महाविद्यालयाने भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण फी , परीक्षा फी संबंधीच्या लेख्यांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करावे :-

अ किर्द, खतावणी, मुद्रांक पावत्या, पी एल ए पासबुक, बँक पुस्तके, चेक इत्यादी (कायम)

ब मंजुरी आदेश, नोंद वहया, अ प्रपत्रे ( ३० वर्षे )

क शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क आवेदन अर्ज ( ५ वर्षे )

# परिशिष्ट - ३

## भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क अर्जांच्या तपासणीसाठी मार्गदर्शक सुचना

१. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण फी, परीक्षा फी आवेदन पत्र परिपूर्ण. भरलेले असावे.

२ उत्पन्नाचा दाखला - उत्पन्नाचा दाखला सक्षम अधिका-याचा असावा. विदयार्थ्यांचे पालक नोकरीत असल्यास तेथील एकूण उत्पन्नाचा दाखला ( उदा मुळ वेतन + महागाई भत्ता + इतर भत्ते मिळून मिळणारे उत्पन्न ) तसेच इतर मार्गांनी मिळणारे उत्पन्न.

३. शाळा सोडल्याचा दाखला - मुळ टी. सी. घेणे, डुप्लीकेट टी. सी. बाबत दोन ठिकाणी प्रवेश घेतला नसल्याबाबत खात्री करण्यात यावी व टी. सी. का सादर करु शकत नाही याबाबत शपथपत्र घेणे.

४. जातीचा दाखला सक्षम अधिका-याचा असावा ( सदर दाखला खाडाखोड केलेला अथवा शंकास्पद नसावा)

५. मागील वर्षाचे उत्तीर्ण झाल्याबाबतचे गुणपत्रक

६. विद्यार्थीनींच्या बाबतीत ( मुलीचे ) लग्न झाले असल्यास पतीच्या उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे

७. विद्यार्थी दुस-या जिल्हयातून शिक्षणासाठी आला असल्यास जिल्हा बदल प्रमाणपत्र जोडणे आवश्यक.

८. विद्यार्थ्याने त्याच जिल्हयातून महाविदयालयास बदलल्यास मागील वर्षी शिष्यवृत्ती मिळाल्याच्या आदेश क्रमांकाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

९. वडील हयात नसल्यास वडिलांचा मृत्यू दाखला आवश्यक

१०. शिक्षणात खंड पडलेला असल्यास सक्षम अधिका-याचे गॅप प्रमाणपत्र व शपथपत्र

११ भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीच्या अर्जावर स्वतःचा अलीकडील पासपोर्ट आकाराचा फोटो असावा.

१२ विद्यार्थी खाजगी किंवा महाविदयालयाच्या वसतिगृहात राहात असल्यास वसतिगृह प्रमाणपत्र.

सदर वसतिगृहात प्रवेश दिल्यापासून वसतिगृह निर्वाह भत्ता देता येईल. परंतु सदर वसतिगृहामध्ये निवासाची व भोजनाची अशा दोन्ही सुविधा असणे आवश्यक आहे. याबाबत खात्री करुन प्रमाणित करण्याची जबाबदारी ही प्राचार्यांची राहील.

१३. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क मंजूर करण्यात येणा-या अभ्यासक्रमास सक्षम विद्यापीठाची / बोर्डाची मान्यता असणे आवश्यक आहे.

१४ विद्यार्थी दुस-या राज्यातून शिक्षणासाठी आला असल्यास त्याचा भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्काचा अर्ज संबंधित राज्यातील संबंधित जिल्हयाचे विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे मंजूरीसाठी पाठविण्यात यावा. प्राचार्यांना शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क मंजूर करता येणार नाही.

# परिशिष्ट - ४

## विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी महाविद्यालयीन अभिलेख तपासणी करीतामुद्दे

### १. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क , परीक्षा शुल्क आवेदन पत्र

i) भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती , शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क आवेदन पत्र हे प्रपत्र " अ " नुसार आहे काय यांची खात्री करणे.

ii) भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती , शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क आवेदन पत्र परिपूर्ण भरलेले आहे काय.

iii) शाळा सोडल्याचा दाखला, सक्षम अधिका-यांचा तसेच विद्यार्थी दुस-या जिल्हयातून आला असल्यास जिल्हा बदल प्रमाणपत्र, त्याच जिल्हयातील दुस-या महाविद्यालयातून आला असल्यास पुर्वीच्या महाविद्यालयाचे शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क मिळाल्याचे आदेश क्रमांक, प्रमाणपत्र, वडील हयात नसल्यास मृत्यु दाखला/ॲफेडेव्हीट, शासकीय अथवा खाजगी वसतिगृहात राहत असल्यास वसतिगृह दाखला इत्यादी सहपत्र जोडलेले आहेत काय.

iv) निर्वाह भत्ता, शिक्षण फी व इतर फी इत्यादी चे दर बरोबर मंजूर केले आहेत काय.

v) मंजूर केलेली रक्कम प्रपत्र अ मध्ये बरोबर नमूद केली आहे काय.

### २. वैयक्तिक स्विय लेखा :- (पी एल ए)

i) वैयक्तिक स्विय लेखा परिपूर्ण नोंदी कोषागारातुन भरुन घेतल्या आहे काय

ii) भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क अंतर्गत अदा केलेले धनादेश त्वरीत कोषागारात पी.एल.ए. मध्ये जमा केले आहे काय

iii) वैयक्तिक स्विय लेख्यामधून आवश्यक तेवढीच रक्कम काढून उर्वरित रक्कम वैयक्तिक स्विय लेख्यामध्ये शिल्लक ठेवली आहे काय

iv) वैयक्तिक स्विय लेख्यातील शिल्लक रक्कम व भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क,
परिक्षा शुल्क वाटप झालेली रक्कम , प्राप्त झालेले अनुदानाशी सुसंगत आहे काय

v) वैयक्तिक स्विय लेख्यातून काढलेली रक्कम पूर्णपणे वाटप झाली आहे काय

### ३. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क मंजूरी आदेश

भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क मंजूरी आदेशामध्ये प्रत्येक विदयार्थ्यांस मंजूर केलेली रक्कम, एकूण रक्कम, मिळालेले अनुदान, वाटप रक्कम इत्यादी बरोबर आहे काय

### ४. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क वाटप नोंदवही

भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती , शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क मंजूर केलेल्या सर्व विदयार्थ्यांच्या तपशिलवार नोंदी शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क वाटप नोंदवहीमध्ये घेतल्या आहेत काय.

२) सदर विद्यार्थी मागील वर्षी ज्या अभ्यासक्रमातील ज्या वर्षात शिकत होता ती परीक्षा त्याने उत्तीर्ण केलेली आहे याची खात्री करुन घ्यावी.

३) नुतनीकरण करताना विद्यार्थ्याकडून प्राप्त आवेदनपत्रे भरुन घेणे बंधनकारक नाही. केवळ अशा विद्यार्थ्यांची यादी "अ" प्रपत्रामध्ये तयार करुन त्यास प्राचार्यांनी मान्यता द्यावी.

४) एका विद्यार्थ्यास एकच अभ्यासक्रम पूर्ण करेपर्यंत ही शिष्यवृत्ती लागू राहील. उदा. ११वी, १२वी कला- बी.ए., एम.ए., एम.फिल., पी.एच.डी. परंतु एखाद्या विद्यार्थ्याने बी.ए. नंतर बी.एड. हा अभ्यासक्रम पूर्ण केला आणि नंतर त्याने एम.ए.साठी प्रवेश घेतला तर एम.ए.कोर्ससाठी त्यास शिष्यवृत्ती मंजूर होणार नाही. परंतु बी.एड. नंतर एम.बी.ए.ला प्रवेश घेतल्यास तो प्रोफेशनल पदव्युत्तर अभ्यासक्रम असल्यामुळे त्यास शिष्यवृत्ती मंजूर करता येईल. एका विद्यार्थ्यास २ व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी ही शिष्यवृत्ती अनुज्ञेय असेल.

५) शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्याने या अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती घेतलेली आहे तो अभ्यासक्रम त्याने पूर्ण केला पाहिजे. जर तो अभ्यासक्रम त्याने अर्धवट सोडला व दुसऱ्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला तर दुसऱ्या अभ्यासक्रमाची शिष्यवृत्ती त्यास अनुज्ञेय होणार नाही. उदा- जरी एका विद्यार्थ्याने बी.एस.सी.प्रथम वर्ष या अभ्यासक्रमाला प्रवेश घेवून पूर्ण वर्षाची शिष्यवृत्ती उचलली होती. पुढील वर्षी बी.एस.सी. द्वितीय वर्गात प्रवेश न घेता त्याने बी.ए.प्रथम वर्षासाठी दुसऱ्याकिंवा त्याच महाविद्यालयात प्रवेश घेतल्यास त्याला शिष्यवृत्ती अनुज्ञेय होणार नाही.बहुतेक विद्यार्थी अर्ध्यातून अभ्यासक्रम सोडून दुसऱ्या अभ्यासक्रमात प्रवेश घेताना गॅप सर्टिफिकीट सादर करतात व त्या प्रतिज्ञापत्रामध्ये मागील वर्षामध्ये कोठेही प्रवेश घेतलेला नव्हता व मी शिकत नव्हतो असे लिहून देतात. वास्तविक पाहता अशा केसेसमध्ये तो मागील वर्षी खरेच कोठेही प्रवेशित नव्हता व त्याने अध्यावरच एखादा अभ्यासक्रम सोडून आता दुसरीकडे प्रवेश घेतो आहे किंवा कसे याविषयी खात्री करणे आवश्यक आहे.

<u>इतर बाबी</u>

१) प्राप्त झालेल्या आवेदन पत्राची विहित नमुन्यातील नोंदवहीत विद्यार्थीनिहाय नोंद घेणे

२) नोंद घेतल्याशिवाय अपूर्ण कागदपत्रे असलेली आवेदनपत्रे वेगळी करुन अपूर्ण कागदपत्रांची विद्यार्थ्याकडून पूर्तता करुन घेणे व पूर्ण असलेली आवेदनपत्रे मंजूरीसाठी प्राचार्यांकडे सादर करणे

३) मंजूर झालेल्या विहित आदेशाच्या ५ प्रती तयार करुन त्या खालीलप्रमाणे वितरीत करणे :-
   अ) पहिली व दुसरी प्रत विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना पाठविणे
   ब) तिसरी प्रत महाविद्यालयाने अभिलेख्यात ठेवणे
   क) चौथी प्रत महालेखापाल यांच्या तपासणीसाठी स्वतंत्र नस्तीमध्ये जतन करुन ठेवणे
   ड) पाचवी प्रत विद्यार्थ्यास माहितीसाठी सूचना फलकावर प्रदर्शित करणे

४) मंजूर झालेल्या आदेशाची नोंद चेक रजिस्टरला घेणे.

५) विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या रकमेप्रमाणे प्रतिमाह चेक आणि शिष्यवृत्तीचे वितरण करुन त्याची नोंद विद्यार्थी वाटप नोंदवहीमध्ये घेणे.

६) विद्यार्थ्यांना वाटप न केलेली व तशीच पडून राहिलेली शिष्यवृत्तीची रक्कम चलनाद्वारे शासकीय तिजोरीत जमा करुन, प्रतिवर्षी उपयोगिता प्रमाणपत्र व चलनाची प्रत चेक रजिस्टरला नोंद करुन विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालयास पाठविणे.

७) एकूण प्राप्त झालेली रक्कम, विद्यार्थ्यांस प्रत्यक्ष वितरीत केलेली रक्कम व त्यानंतर जादा लागणारी किंवा उरलेली रक्कम याबाबत सविस्तर हिशोब विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना देणे

८) भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीकरीता मिळालेल्या रकमेचा हिशोब ठेवण्यासाठी स्वतंत्र कीर्द व खतावणी ठेवणे व ती सनदी लेखापाल ( चार्टर्ड अकाऊंटंट ) यांचेकडून तपासून, वैरीजपत्रक निर्धारणासाठी विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचेकडे पाठविणे

९) मागील वर्षी आक्षेपाअभावी प्रलंबित असलेली आवेदनपत्रे विद्यार्थ्यांना वारंवार सूचना करुनही कागदपत्रे पूर्ण न केल्यास तसे विद्यार्थ्यांना कळविणे

१०) मागील वर्षी मंजूर करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीबाबतची सांख्यिकी माहिती विहित प्रपत्रात वर्गनिहाय शिष्यवृत्तीचे दर (निवासी, अनिवासी मुले-मुली यांच्या संख्येसह) सविस्तर माहिती विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालयास सादर करणे.

११) दरमहा मासिक खर्चाचे विवरणपत्र विहित नमुन्यात विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालयाला सादर करणे.

१२) प्रत्येक वर्षाच्या ऑक्टोबर महिन्यात पुढील वर्षाचे अंदाजपत्रक विहित नमुन्यात सादर करणे

१३) जे विद्यार्थी संस्था बदलतात त्यांना संस्था बदली प्रमाणपत्र व मागील वर्षी मंजूर केलेल्या शिष्यवृत्तीचा मंजूरी आदेश क्रमांक व दिनांक देण्याची व्यवस्था करणे.

१४) सर्व महाविद्यालयांनी त्यांना प्राप्त झालेली रक्कम जिल्हा कोषागार कार्यालयात पी.एल.ए. खात्यामध्ये जमा करावी आणि दरमहा आवश्यक तेवढीच रक्कम पी.एल.ए. मधून काढून ती विद्यार्थ्यांना चेकद्वारे वितरीत करावी.

१५) व्यावसायिक पाठयक्रम पूर्ण करुन अव्यावसायिक पाठयक्रमास प्रवेश घेतल्यास त्यास शिष्यवृत्ती मिळणार नाही. उदा- बी.एड. अथवा एल.एल.बी. पूर्ण झाल्यानंतर एम.ए., एम.एस्सी., एम.कॉम इ. साठी प्रवेश घेतल्यास त्यास शिष्यवृत्ती अनुज्ञेय नाही.

१६) महाराष्ट्रा बाहेरचे विद्यार्थी जर महाविद्यालयात शिकत असतील तर त्यांना महाराष्ट्र शासनातर्फे ही शिष्यवृत्ती मंजूर होणार नाही. अशा विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ते ज्या राज्यातील आहेत त्या राज्याकडे पाठवून त्या राज्यातून अशी शिष्यवृत्ती प्राप्त करुन घ्यावी. परराज्यातील विद्यार्थ्यांस आवेदनपत्रे मंजूर करु नयेत.

१७) दरमहा शिष्यवृत्ती वितरण करताना विद्यार्थ्यांची हजेरी ७५% असली पाहिजे, हे बंधन पाळण्यात यावे.

१८) पुढील वर्षी तदर्थ अनुदान मागणी करताना सोबत मागील वर्षाचे उपयोगिता प्रमाणत्र सादर करणे सक्तीचे आहे.

१९) विद्यार्थ्याने डुप्लिकेट टी.सी. वर प्रवेश घेतला असल्यास त्याने मूळ टी.सी. सादर केल्याशिवाय त्यास शिष्यवृत्ती मंजूर करु नये.

२०) कायम विनाअनुदानित महाविद्यालयास शासनाची मान्यता असल्यास त्या महाविद्यालयामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनमान्य अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती मंजूर करता येईल.

२१) शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काचे दर हे संबंधीत विद्यापीठाने ठरवून दिलेल्या दराएवढेच असावेत.

**************